# २७ फेब्रुवारी मराठी भाषा गौरव दिन

**Dr. Ashwini Pravin Dehadrai**

PRT TEACHER
BHAVAN'S B.P. VIDYA MANDIR

संतांची भूमी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महाराष्ट्रातील मायबोली 'अमृता तेही पैजा जिंकणारी मराठी' त्या मराठीची आजची अवस्था कशी आहे. आपण निर्माण केलेल्या मराठीच्या या अवस्थेतून आपल्याला जागृत करण्याचे काम कविवर्य कुसुमाग्रज यांनी आपल्या फटक्यातून केले आहे.

भाषा मरता देशही मरतो संस्कृतीचा ही दिवा विझे।
गुलाम भाषिक होऊन आपुल्या प्रगतीचे शीर कापु नका।।

कुसुमाग्रजांनी भाषेचा प्रचार उत्तमरीत्या केला आहे. २७ फेब्रुवारी मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने हे अवचित्यपूर्ण वाटले. साधारणतः 1500 वर्षांचा इतिहास जपणारी मराठी ही भाषा आहे. मराठी भाषेची पूर्ववैदिक, वैदिक, संस्कृत , पाली, प्राकृत ,अपभ्रंश अशी उत्क्रांती झाली. असा प्रवास करून स्वतःचे स्थान तिने मराठी मनावर कोरलेले आहे. हे कायम ठेवण्यासाठी मराठी भाषेवर प्रेम करून तिची जपणूक करावी लागेल. यासाठी आपल्या मातृभाषेचा पाया भक्कम पाहिजे. "जर मदर टंग येत नाही तर अदर टंग कशी कळेल." हे सूत्र ध्यानात ठेवून आपली भाषा समृद्ध करण्यासाठी तिला जिवंत ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे लागेल. मराठी साहित्य वर्तुळ जसे समृद्ध आहे तशी मराठी भाषा ही समृद्ध आहे. हा मराठीचा साहित्य सागर आम्ही आपल्या मुलांपर्यंत पोहोचवला आहे का? असा प्रश्न मनात येतो. अपवाद असतीलही. आपले साहित्य व आपली संस्कृती पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी आपण किती असमर्थ आहोत, याचे उदाहरण

'भुलाबाई 'हा उत्सव भाद्रपद ते अश्विन महिन्यापर्यंत असायचा. त्यातील काही गाणे( भोंडल्याची गाणी) आजही आठवतात.
“सासुबाई सासूबाई मज मूळ आलं
आता तरी धाडा ना धाडा ना"

यातल्या 'मूळ' या शब्दाचा अर्थ जवळजवळ संपत आला आहे.मूळ म्हणजे Roots एवढेच ध्यानात येते.( मूळ म्हणजे सासुरवाशीण मुलीला घ्यायला आलेला माहेरचा व्यक्ती) हा शब्द लोप पावत आहे. काही वाक्प्रचार आठवतात. काय चऱ्हाट लावलं. चर्चेचे गुऱ्हाळ. हे वाक्प्रचार आज भाषेत लयाला गेले आहेत. सीमांतपूजनाचा खरा अर्थ गावाच्या सीमेत प्रवेश केल्यानंतर पाहुण्यांचे स्वागत करणे हा अपेक्षित अर्थ आहे. एकमेकांची ओळख करून देणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. हा अर्थ विसरून आपण आपली संस्कृती सोडून पाश्चात्य संस्कृतीच्या मागे धावतो आहोत. आपल्या संस्कृतीची आणि आपल्या मायबोलीची ओळख पुढच्या पिढीला करून देण्याची आपली जबाबदारी आहे . ती जबाबदारी आपण पूर्ण करत आहोत का?

मराठी भाषेचा विचार करताना श्री.म. माटे यांच्या 'भाषाविवृद्धीची सामाजिक दृष्टी' या लेखाचा विचार करणे अत्यंत गरजेचे आहे. या लेखातून श्री म माटे यांना भाषा समृद्ध होण्यासाठी नवीन नवीन शब्दांची भर त्या भाषेत पाडण्यासाठी काय व्हायला हवे यावर चर्चा केली आहे. सर्वसामान्य वर्गातून लेखक पुढे आले तर भाषेच्या शब्दकोशात कशी भर पडेल याचे विवेचन केले आहे. ज्याने प्रथम 'कवळणे' म्हणजे 'दोन बाहूंच्या पाशात कवटाळीने' हा शब्दप्रयोग केला. त्याने रूपकच केले होते. 'कवळ ' म्हणजे घास, वरचा जबडा खालचा जबडा मध्ये सापडणारा तो कवळ म्हणजे घास. त्याच त्याचप्रमाणे दोन भुजातं जी वस्तू सापडली तिचाही घास झाला म्हणजे ती आपण कवळली. कालांतराने हे काव्य नाहीसे होऊन तो शब्द कवटाळणे या अर्थाचा केवळ गद्यरूप होऊन बसला. लेखकांनी आपल्या भाषा विकासाकडे महत्त्व प्रयासाने लक्ष वेधले. या मायबोलीची तळमळ ज्ञानेश्वरांनाही असल्याचे आपण बघतो, अभ्यासतो.

संत ज्ञानेश्वर महाराजांनी भक्तिमार्गाची कवाडे सर्वांस मोकळी करताच अनेक जातीत संत उत्पन्न झाले. परमार्थ विचार सांगताना त्यांनी काय केले ते पहा. संत नरहरी सोनार म्हणतात,
देवा तुझा मी सोनार । तुझे नामाचा व्यवहार।।
संत सावता माळी म्हणतात,
कांदा मुळा भाजी। अवघी विठाई माझी।।
संत सेना नाव्ही म्हणतात,

आम्ही वारीक वारीक। करू हजामत बारीक।।

एकीकडे सर्व समाजाचे मनोगत व्यक्त होण्याचे कार्य होईल व दुसरीकडे शब्दकोश पुष्ट होत जाईल. या विवेचनावरून 'भाषा समृद्धीकडे सामाजिक दृष्टीने पहाणे 'काळाची गरज आहे. आपली भाषा वाचविण्यासाठी व वाढविण्यासाठी एवढे प्रयत्न झाले तर ती समृद्ध भाषा आपण पुढच्या पिढीपर्यंत नेण्याची आपली नैतिक जबाबदारी आहे . मराठी भाषेला समृद्ध करण्याची परंपरा पुढे चालवण्याचे कंकण आपण बांधले तर मराठी भाषेचे सौंदर्य चारी अंगांनी खुलत राहील यात शंका नाही. सर्व मराठी भाषिकांना २७ फेब्रुवारी 'मराठी भाषा गौरव दिनानिमित्त' आभाळभर शुभेच्छा. आपली भाषा, आपली मायबोली, हे अंतिम सत्य स्वीकारले तर आपोआप आपल्या भाषेची सेवा आपल्या हातून सहज होईल . असा दृढ विश्वास वाटतो.